## औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

दि. २.१.२००२ रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद मंडळाच्या (११६) व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

सदर बैठकीस मंडळाचे खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] मा. श्री. कुंडलिकराव नागरे. | .. | सभापती/औरंगाबाद मंडळ |
| २] मा. श्री. एन. व्हि. येरावार. | .. | मुख्य अधिकारी तथा<br>उप सभापती/औ"बाद मंडळ |
| ३] मा. श्री. बबनराव देशमुख | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ४] मा. श्री. साहेबराव खरात. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ५] मा. श्री. मकरंद सावे. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ६] मा. श्री. संजय वाघचौरे. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ७] मा. श्री. वामनराव राऊत. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| ८] मा. सौ. शैलेजा गायकवाड. | .. | सदस्या/औरंगाबाद मंडळ. |
| ९] मा. डॉ. श्री. डि. डि. शिंदे. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| १०] मा. ॲड. श्री. जे. पी. पाटील. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ११] मा. श्री. राजेश्वर चव्हाण. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ |
| १२] श्री. डी. पी. कुलकर्णी,<br>उप अभियंता, महानगरपालिका,<br>[मा. आयुक्त म. न. पा. यांचे<br>प्रतिनिधी. ] | .. | सदस्य प्रतिनिधी. |
| १३] श्री. मो. मुदस्सीर,<br>नगर रचनाकार,<br>[मा. उपसंचालक, नगर रचना,<br>यांचे प्रतिनिधी. ]. | .. | सदस्य प्रतिनिधी. |

मंडळाच्या ११६ व्या बैठकीत औरंगाबाद मंडळाचा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचा विषय असल्यामुळे या बैठकीस " विशेष निमंत्रीत" म्हणून उपस्थित राहण्यासाठी म्हाडा, मुंबई चे सदस्य मा. आ. श्री. नितीन पाटील यांना मंडळाचे वतीने विनंती केल्यानुसार मा. आ. श्री. नितीन पाटील हे उपस्थित राहिले. औरंगाबाद मंडळाच्या वतीने मा. आ. श्री. नितीन पाटील यांचे बैठकीत मंडळाचे सभापती, मा. आ. श्री. नागरे यांचे हस्ते शाल व श्रीफळ देवून स्वागत केले व नंतर बैठकीस उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांचे मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी स्वागत करून मा. सभापती/औरंगाबाद मंडळ यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात झाली.

.. २ ..

बैठकीच्या सुरुवातीस मा. आ. श्री. नितीन पाटील, सदस्य, म्हाडा यांनी सांगितले की, औरंगाबाद मंडळा अंतर्गत तालुका स्तरावर गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी मंडळाचे सभापती, यांचे मार्गदर्शनाने व सर्व सदस्य यांचे सहकार्याने व समन्वयाने योजनांचे प्रस्ताव तयार करुन प्राधिकरणाकडे पाठविले तर त्यास प्राधिकरण स्तरावर शक्य तितक्या लवकर मंजूरी देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल. असे आश्वासन मा. आ. श्री. नितीन पाटील यांनी बैठकीत दिले. तसेच मंडळाच्या अधिका-यांनी योजनांसाठी जमिनी उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत असेही प्रतिपादन मा. आ. श्री. नितीन पाटील यांनी बैठकीत केले.

मंडळाचे सभापती मा. आ. श्री. कुंडलीकराव नागरे, यांनी बैठकीत अधिका-यांना सूचना दिल्या की, लोक आवास योजना, ग्रामीण निवारा योजना व मंडळाच्या नियमित योजनांच्या कामाचा वेग वाढविणे आवश्यक आहे. सदर योजना राबविण्याच्या कामाविषयी काही अडचणी असल्यास त्या ~~मा. सभापती~~ मुख्य यांचे नजरेस आणून द्याव्यात जेणे करुन त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच कार्यकारी अभियंता, उप अभियंता/जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांनी मंडळाचे सदस्य यांचेही सहकार्य घेवून व त्यांचेशी समन्वय साधुन त्यांचे संपर्कात ~~स~~ राहून योजनांच्या कामास गती द्यावी अशाही सुचना मा. सभापती यांनी बैठकीत सर्व अधिका-यांना दिल्या. मा. सभापती यांनी मंडळाच्या जिल्हा मुख्यालयातील अधिका-यांना/मंडळातील अधिका-यांना सक्त सूचना दिल्या की, त्यांनी त्यांचे मुख्यालयात [ दौ-याचे दिवस सोडून ] उपस्थित रहावे व विनापरवाना मुख्यालयात गैरहजर असल्यास त्यांचे विरुध्द योग्य ती कठोर कारवाई करण्यांत यावी अशाही सुचना मा. सभापती यांनी दिल्या व त्या त्या जिल्हयाच्या सदस्यांच्या संपर्कात रहावे, चालु व नविन योजनांविषयी सदस्यांना माहिती द्यावी. जेणेकरुन मंडळाचे कामकाज सुरळीत चालेल.

मा. सभापती यांनी मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांना सांगितले की, बीड येथे गृहनिर्माण योजना लवकरात लवकर ~~====~~ कार्यान्वीत करण्यासाठी प्राधिकरणाकडून मंजूरी प्राप्त करुन घेणेसाठी कार्यवाही करावी जेणेकरुन ग्रामीण भागातील योजना कार्यान्वीत होईल.

.. ३ ..

वरिल प्रमाणे चर्चा झाल्यानंतर पटलावरील विषयावर चर्चा करण्यास मंडळाने सुरु केले.

विषय क्रं. [१] : दि. २९. ११. २००१ रोजी झालेल्या ११५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

मंडळाच्या ११५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत श्री. ए. एस. कुलकर्णी, शाखा अभियंता यांनी मंडळास वाचुन दाखविला. या कार्यवृत्तांतावर मंडळाने सविस्तर चर्चा केली. बैठकीत सर्वे क्रं. ४३० [भाग], ४३१[भाग] रेल्वे स्टेशन रोड, जालना येथिल सुविधा भूखंडाच्या वितरणाबाबचा मुद्दा सदस्य श्री. देशमुख व श्री. राऊत यांनी उपस्थित केला. त्यांनी बैठकीत सांगितले की, जालना येथिल भूखंडासाठी जरी दोन निविदा प्राप्त झाल्या तरी निविदेतील दर हे कमी आहेत व सध्या जालना येथे भूखंडाच्या किंमती भरमसाठ वाढल्या आहेत. मागील बैठकीत ठरले होते की, जालना येथे भुखंडाच्या खरेदी विक्रीचे प्रचलित बाजारभाव काय भाव आहेत/रजिस्ट्री कार्यालयात जालना शहरातील भूखंडाचे ~~क्रय भाव~~ किंमती आहेत याची माहिती संकलीत करुन ती विचारार्थ मंडळापूढे सादर करावी. परंतु अशा प्रकारची माहिती मंडळापुढे सादर केलेली नाही. तथापी, भूखंडाच्या प्राप्त निविदेतील दर हे अत्यंत कमी आहेत. व जालना शहरात भूखंडाचे दर भरमसाठ आहेत त्यामुळे जालना येथिल सुविधा भूखंडासाठी परत जाहिरात देवून निविदेद्वारे मागणी अजमाविली तर आणखीन जास्त दराच्या निविदा प्राप्त होऊ शकतील व त्या योगे मंडळाच्या फायदा होईल असेही मत सदस्य श्री. राऊत व श्री. देशमुख यांनी व्यक्त केले. यावर मंडळाचे मा. सभापती यांनीही मत व्यक्त केले की, भूखंडासाठी ~~र~~ परत निविदा मागवून मंडळाचा फायदा होत असेल तर जाहिरात देवून परत निविदा मागवाव्यात याविषयी वरिल प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मंडळाने एकमताने निर्णय घेतला की, जालना येथिल स. क्रं. ४३०[भाग], ४३१ [भाग] रेल्वे स्टेशन रोड, या ठिकाणाच्या सुविधा भूखंडाच्या वितरणासाठी परत जाहिरात देवून निविदा मागवाव्यात. यावर मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी मिळकत व्यवस्थापक यांना सुचना दिल्या की, सुविधा भूखंडाची परत जाहिरात देण्यासाठी सर्व कायदेशिर कार्यवाही करण्यासाठी सुचना दिल्या. दि. २९. ११. ०१ रोजी झालेल्या ११५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा होवून मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ६९९ :

मंडळाच्या दि. २९. ११. २००१ रोजी झालेल्या ११५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वरील चर्चेनुसार कायम करण्यात आला व जालना येथिल स. नं. ४३० [भाग] व ४३१ [भाग] रेल्वे स्टेशन रोड येथिल सुविधा भूखंडासाठी निविदा पुन्हा मागविण्यात याव्यात याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

विषय क्रं. [२] : तिसगांव येथिल अल्प उ. गट/मध्यम उ. गट गृहनिर्माण योजने अंतर्गत बांधण्यांत आलेल्या गाळ्याबाबत.

सदर विषयाची बाब टिप्पणी मंडळाच्या आगामी बैठकीत मंडळाच्या विचारार्थ पुन्हा सादर करावी अशा सूचना मा. सभापती/औरंगाबाद मंडळ यांनी बैठकीत मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांना दिल्या.

विषय क्रं. [३] : सन २००१-२००२ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००२-२००३ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.

या विषयाची बाब टिप्पणी मंडळाचे मुख्य लेखा अधिकारी श्री. त्रिंबके, यांनी मंडळास वाचुन दाखविली या विषयी मा. सभापती, औरंगाबाद मंडळ यांनी मंडळाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या की, मंडळाच्या अर्थसंकल्पात/अंदाजपत्रकात मंडळाच्या विविध योजनांसाठी ज्या आर्थिक तरतुदी करण्यांत आलेल्या आहेत किंवा ज्या खर्चाच्या तरतुदी करण्यांत आल्या आहेत. ती खर्चाची रक्कम/तरतुद त्या त्या वर्षी योजनांवर खर्ची होईल हे पाहणे अत्यंत जरुरीचे आहे. जेणेकरुन मंडळाचा निधी परत जाणार नाही व त्याचा विनियोग संपुर्णपणे केला जाईल. मंडळाचे सदस्य श्री. सावे, यांनी प्रतिपादन केले की, ग्रामीण भागात मंडळाला ज्या गृहनिर्माण योजना राबवाव्या लागतील किंवा मंडळ ज्या योजनांना यापुढे मंजूरी देईल त्यास निधीची उपलब्धता करुन घेणेसाठी व त्यास प्राधिकरणाची मंजूरी घेऊन निधीची वेळोवेळी उपलब्धता प्राधिकरणाकडून केल्या जाईल अशा प्रकारची शिफारसही प्राधिकरणाला अंदाजपत्रक सादर करतेवेळी करण्यात यावी जेणे करुन योजनांना वेळीच निधी उपलब्ध होवू शकेल.

उपरोक्त चर्चेअंती मंडळाने एकमताने निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७०० :

औरंगाबाद मंडळाचे सन २००१-२००२ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००२-२००३ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मंजूर करण्यात येत आहे. व सदर अंदाजपत्रके प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात यावेत. तसेच याविषयी चर्चा करताना मंडळाने जे चर्चेत मुद्दे उपस्थित केले तेही प्राधिकरणास शिफारशीसह कळविण्यात यावेत असा निर्णय मंडळाने घेतला. सदर ठरावाच्या (स्थायीकरणाच्या) वाट न पहाता पुढील कारवाई करण्यात यावी असेही बैठकीत ठरले.

वरिल प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर मंडळाचे सन्माननीय सदस्य यांनी खालील प्रमाणे बैठकीत मुद्दे उपस्थित केले.

१] मा. सदस्या सौ. गायकवाड यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, मंडळाच्या गंगाखेड रोड परभणी येथिल २५ गाळे अल्प उत्पन्न गट व १५ गाळे मध्यम उत्पन्न गट योजनेलगत असलेले मोकळे [तिन भूखंड] नुतन विद्या मंदिर शिक्षण संस्था, परभणी या शाळेस शैक्षणिक कारणासाठी देण्यात यावे म्हणून नुतन विद्यामंदिर, परभणीच्या पदाधिका-यांनी मंडळाच्या कार्यालयात तशी मागणी केली आहे. परंतु अद्याप पर्यंत हे भूखंड उक्त संस्थेस सवलतीच्या दरात देण्याबाबत त्यांना काहीही कळविले नाही. म्हणून मा. सदस्या, सौ. गायकवाड यांनी खेद व्यक्त केला. सदर भूखंड शैक्षणिक संस्थेस दिले तर त्यायोगे रिक्त पडलेले गाळे वाटप होण्यास मदत होईल असेही मत मा. सौ. गायकवाड, सदस्या यांनी व्यक्त केले. यावर मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, सदर शैक्षणिक संस्थेस भूखंड देणेबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणास/शासनास पाठवावा लागेल. परंतु तत्पूर्वी ही बाब मंडळाच्या विचारार्थ पुढील बैठकीत विचारार्थ सादर करण्यात येईल. याबाबत मुख्य अधिकारी यांनी मिळकत व्यवस्थापक/औरंगाबाद मंडळ यांना सूचना दिल्या की, उपरोक्त विषयाची बाब टिप्पणी मंडळा समोर पुढील बैठकीत विनियमातील तरतुदीसह विचारार्थ सादर करावी.

२] मा. श्री. सावे, सदस्य यांनी बैठकीत मुद्दा उपस्थित केला की, मंडळाच्या सदस्यांसाठी औरंगाबाद येथे सुव्यवस्थित विश्रामगृह उपलब्ध करुन देण्याची कारवाई अद्याप केली नाही व वेळोवेळी याविषयी

बैठकीत सुचना देवूनही अद्याप कार्यवाही झाली नाही. याबाबत बैठकीत सर्व सदस्यांनी तक्रार नोंदविली. याबाबत मुख्य अधिकारी, यांनी मंडळास माहीती दिली की, विश्राम गृहाच्या दुरुस्तीच्या खर्चास नुकतीच मंजूरी मिळाली आहे व तांत्रिक मान्यता देवून लवकरात लवकर विश्रामगृह दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात येईल.

३] मा. श्री. सावे, सदस्य यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, लातूर येथे ६१५ गाळे अल्प उत्पन्न गट योजना मधील गाळ्यांसाठी लाभार्थी यांनी डिमांड ड्राफ्टद्वारे पैसे भरण्यासाठी लातूर कार्यालयात अर्जाद्वारे विनंती केली असता त्याचे डि. डि. स्विकारले नाहीत व त्यामुळे तेथिल लाभार्थींना गाळे वाटप झालेले नाहीत व लाभार्थी गाळे मिळण्यापासून वंचीत राहिले. याबाबत डि. डि. का स्विकारले नाहीत याची सविस्तर माहिती मंडळासमोर सादर करावी. याबाबत मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी मिळकत व्यवस्थापक यांना सुचना दिल्या की, उक्त प्रकरणी सविस्तरपणे माहिती मंडळासमोर पुढील बैठकीत सादर करावी.

४] मा. सदस्य श्री. वाघचौरे यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, पैठण येथे गृहनिर्माण योजना राबविणेस्तव व त्यासाठी जिल्हाधिकारी, औरंगाबाद किंवा महसुल विभागाकडे जमिन प्राप्त करुन घेणेसाठी मंडळाचे अधिकारी पाठपुरावा करित नाही व याबाबत वारंवार सांगुन देखील मंडळाचे अधिकारी महसुल विभागाकडे पाठपुरावा करित नाही, परिणामी पैठण येथे योजना राबविण्याच्या कामी विलंब होत आहे. याबाबत मा. सभापती यांनी मुख्य अधिकारी यांना सुचना दिल्या की, पैठण येथे जमिन प्राप्त करुन घेण्यासाठी महसुल विभागाकडे पाठपुरावा करावा व याकामी काही अडचणी निर्माण झाल्या असतील तर त्याबाबत सभापती व मंडळाचे सदस्य यांचे सहकार्य घ्यावे.

५] मा. सदस्य श्री. खरात यांनी बैठकीत नमुद केले की, जालना येथिल बीडी कामगार योजनेतील गाळ्यांच्या साहित्याच्या चोरी बाबत वेळोवेळी बैठकीत चर्चा करुन व त्यावर मंडळाने निर्णय घेवून देखील अद्याप पर्यंत साहित्याच्या चोरी प्रकरणी जबाबदार ठरणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणतीही ठोस कार्यवाही केली नाही व ही बाब खेदाची आहे. उक्त प्रकरणी तात्काळ जबाबदारी निश्चित करण्याची

कारवाई का केली नाही म्हणून मा. श्री. खरात यांनी सांगितले. याबाबत मा. सभापती व सर्व सदस्यांनी सांगितले की, सदर प्रकरणी मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी [मागील बैठकांत वेळोवेळी ठरल्या-प्रमाणे] कारवाई करुन मंडळाच्या पुढील बैठकीत अहवाल सादर करावा.

६] मा. सदस्य श्री. बबनराव देशमुख, यांनी बैठकीत नमुद केले की, मंडळाच्या भोकरदन येथिल प्रस्तावित गृहनिर्माण योजनेचे काम लवकरात लवकर सुरु करावे, जेणेकरुन लाभार्थींना लवकरात लवकर घरे मिळतील. याबाबत मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी बैठकीत सांगितले की, भोकरदन येथे योजना कार्यान्वीत करणेसाठी सर्व ती उचीत कारवाई तात्काळ करण्यांत येईल.

७] मा. श्री. बबनराव देशमुख व मा. श्री. राऊत यांनी जालना येथिल स. नं. ४१३ वरिल मध्यम उत्पन्न गट योजनेतील गाळ्यांसाठी तात्काळ जाहिरात देण्यांत यावी असे सांगितले. याविषयी मुख्य अधिकारी यांनी मिळकत व्यवस्थापक/औरंगाबाद मंडळ यांना सुचना दिल्या की जालना येथिल स. नं. ४१३ वरिल मध्यम उत्पन्न गट योजनेतील गाळ्यांसाठीची जाहिरात तात्काळ देण्यांत यावी.

८] मंडळाचे सदस्य मा. डॉ. श्री. शिंदे यांनी बैठकीत सांगीतले की, मंडळा मार्फत प्रसिध्दी होणा-या गाळे/भुखंड वाटपाच्या जाहिरातीची प्रत व तसेच निविदांच्या जाहिरातीची प्रत ~~सर्व~~ मंडळाच्या ~~सर्व~~ सदस्यांना वेळेवर पोहोचविल्या जात नाहीत किंवा त्याची प्रत दिल्या जात नाही यापुढे मंडळातर्फे वर्तमानपत्रात ~~प्रसिध्द~~ प्रसिध्द होणा-या जाहिरातीच्या प्रती मंडळाच्या सर्व सदस्यांना पाठविण्याची दक्षता मंडळाच्या अधिका-यांनी घ्यावी अशा सुचना मा. सभापती/औ. मं. यांनी मुख्य लेखा अधिकारी/मिळकत व्यवस्थापक यांना बैठकीत सुचना दिल्या की, मंडळाच्या जाहिरातीची प्रत मा. सभापती व मंडळाचे सर्व मा. सदस्य यांना विनाविलंब पाठविण्याची कार्यवाही यापुढे करावी.

वरील प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर व वरिल प्रमाणे चर्चा व ठराव संमत झाल्यानंतर मा. सभापती यांचे ~~चे~~ परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन राष्ट्रगितानंतर बैठक समाप्त झाली.

मुख्य अधिकारी/औ. मं. ✓ मा. सभापती/औरंगाबाद मंडळ